02 SEP 2024

पुण्यनगरी


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'एआय'च्या झंझावातात बुद्धिमत्तेचा ऱ्हास चिंताजनक

## डॉ. शिरीष शेवडे : विद्यापीठात आर्टिफिशिअल इंटेलिजन्स फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट केंद्राचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या झंझावातामध्ये मानवाच्या खऱ्या बुद्धिमत्तेचा ऱ्हास होत जाणे चिंताजनक आहे, असे प्रतिपादन बेंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे प्राध्यापक डॉ. शिरीष शेवडे यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागामध्ये नव्याने स्थापन करण्यात येत असलेल्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशिअल इंटेलिजन्स फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट' या केंद्राचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानिमित्ताने आयोजित 'ए.आय. ते जेन-ए. आय. : संधी आणि आव्हाने' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना डॉ. शिरीष शेवडे. सोबत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. शशिभूषण महाडिक.**

डॉ. शेवडे म्हणाले, तंत्रज्ञानाच्या आहारी जाणे योग्य नाही. चॅट जीपीटीसारखे जनरेटिव्ह ए. आय. अनेकदा चुकीची माहिती पुरविते आणि त्या माहितीचे समर्थनही करते. वापरकर्त्यालाही माहिती चुकीची असल्याचे ठाऊक नसेल, तर पुन्हा दिशाभूल होऊ शकते. त्यामुळे ही सर्व माध्यमे अत्यंत काळजीपूर्वक आणि जबाबदारपूर्वक वापरावीत.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विविध साधनांचे आपण केवळ वापरकर्ते बनून न राहता सर्जक निर्माते बनणे आवश्यक आहे. त्यासाठी सातत्याने नवनवीन बाबी शिकत राहणे आणि विश्लेषणाची सवय लावून घेणे फार महत्त्वाचे आहे.

संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुकुमार राजगुरू यांनी आभार मानले. ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. आर. एन. रट्टीहाळी, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरिता ठकार, इनोव्हेशन, इन्क्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, डॉ. कविता ओझा, डॉ. सोमनाथ पवार आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 SEP 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि अवलॉन पॉवर यांच्यात ग्रीन हायड्रोजनसाठी सामंजस्य करार करताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, रजिस्ट्रार डॉ. व्ही. एन. शिंदे, अवलॉनचे सुरेंद्र जैन, वरुण जैन आदी.

# शिवाजी विद्यापीठ-अवलॉनमध्ये ग्रीन हायड्रोजनसाठी सामंजस्य करार

**शिरोली एमआयडीसी : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ आणि अवलॉन पॉवर शाश्वत आणि स्वच्छ ऊर्जेच्या विकासासाठी भविष्यात संयुक्तपणे योगदान देतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ग्रीन हायड्रोजन प्रकल्पासाठी झालेल्या सामंजस्य कराप्रसंगी ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात करारावर कुलगुरू डॉ. शिर्के आणि कंपनीतर्फे चेअरमन सुरेंद्र जैन यांनी स्वाक्षऱ्या केल्या. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, रजिस्ट्रार डॉ. व्ही. एन. शिंदे, 'अवलॉन'चे व्यवस्थापकीय संचालक व प्रकल्प प्रमुख वरुण जैन, संचालक आशा जैन उपस्थित होते.

वरुण जैन म्हणाले, ग्रीन हायड्रोजन निर्मितीसाठी इंजिनिअरिंग, खरेदी आणि बांधकामाच्या क्षमतेची यशस्वी अंमलबजावणी आणि विस्तारीकरण यासाठी अवलॉन पॉवर महत्त्वाची भूमिका निभावेल.

यावेळी प्रा. डॉ. जे. बी. जाधव, डॉ. एस. डी. डेलेकर, सुभाष माने, अवलॉनचे प्रवीण आंबेसकर, 'स्मॅक'चे ऑ. सेक्रेटरी भरत जाधव, क्लस्टर अध्यक्ष राजू पाटील, 'केईए'चे अध्यक्ष बाबासो कोंडेकर, उपाध्यक्ष कमलाकांत कुलकर्णी, 'मॅक'चे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे, उपाध्यक्ष मोहन कुशिरे, 'आयआयएफ'चे अध्यक्ष विनय खोबरे, उपाध्यक्ष राहुल पाटील, महेश दाते, एम. बी. शेख आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 SEP 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून संत तुकाराम गाथा खरेदीसाठी आवाहन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाने प्रकाशित केलेली व मारुतीराव जाधव (तळाशीकर गुरुजी) यांनी केलेली तुकारामबावांच्या गाथेचे निरूपण भाग १ व २ अद्ययावत दुसरी आवृत्ती खरेदीसाठी उपलब्ध आहे. विद्यापीठातील कंझ्युमर स्टोअर ॲनेक्स इमारतीत संत तुकारामांची गाथा उपलब्ध आहे. बाहेरगावातील व्यक्तींना अद्ययावत दुसरी आवृत्ती ऑनलाईन घेता येणार आहे. ग्रंथप्रेमींनी संत तुकाराम यांची गाथा खरेदी करावी, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 SEP 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात उद्या कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागातर्फे 'यू-ट्यूब चॅनेल निर्माण व रोजगार' विषयावर मंगळवार (ता. ३) व बुधवारी (ता. ४) कार्यशाळा होत आहे. वि. स. खांडेकर भवन येथे कार्यशाळेचे आयोजन केले आहे. केंद्र शासनाच्या पीएम उषा योजनेंतर्गत आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. त्यात यू-ट्यूब सिल्वर प्ले विजेता विष्णू वजार्डे, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. आलोक जत्राटकर, फिल्म परीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया, व्हिडिओ इडिटर डॉ. सुषमा चौगले, डॉ. अक्षय भोसले मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 SEP 2024
लोकमत

# 'यूट्यूब चॅनेल रोजगार'वर कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाच्यावतीने यूट्यूब चॅनेल निर्माण व रोजगार या विषयावर मंगळवारी व बुधवारी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन वि. स. खांडेकर भवन येथे करण्यात आल्याची माहिती हिंदी अधिविभागाच्या प्र. प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी दिली. केंद्र शासनाच्या पीएम उषा योजनेंतर्गत आयोजित या कार्यशाळेचे उद्घाटन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता होणार आहे. या कार्यशाळेत यूट्यूब सिल्व्हर प्ले विजेता विष्णू वजार्डे, विश्लेषक डॉ. शिवाजी जाधव, समाज माध्यम तज्ज्ञ डॉ. आलोक जत्राटकर, फिल्म परीक्षक व समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया, व्हिडीओ एडिटर डॉ. सुषमा चौगले, डॉ. अक्षय भोसले यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.